महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात ७ फेब्रुवारीला मोफत कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर ता.३१ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने ७ फेब्रुवारीला सकाळी ११ ते सायं. ५ या वेळात एकदिवशीय मोफत कौशल्य कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

या कार्यशाळेत सूत्रसंचालन शास्त्राची ओळख, सूत्रसंचालनाचे महत्त्व, विविध कार्यक्रमातील सूत्रसंचालन, इव्हेंट मॅनेजमेन्ट, करियर संधी अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने समाजातील विविध स्तरातील नागरिकांना अत्यंत उपयुक्त असे कोर्सेस घेतले जातात. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही डॉ. रामचंद्र पवार यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# राज्यशास्त्र परिषदेच्या उपाध्यक्षपदी प्रा. पाटील



मुरगूड : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाचे उपप्राचार्य व राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. टी. एम. पाटील (मळगे बु.) यांची शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद कार्यकारिणीवर उपाध्यक्षपदी एकमताने निवड झाली आहे. डॉ. पाटील यांनी यापूर्वी महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक अभ्यास मंडळावर सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य, विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे सदस्य म्हणून काम केले आहे.

तरूण भारत

# विद्यापीठ विकास आघाडीचे व्यवस्थापन परिषदेवर वर्चस्व



- पाच जागा बिनविरोध
- शिक्षक एक आणि पदवीधर एक अशा दोन जागेसाठी ८ फेब्रुवारीला मतदान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे मतदान ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे. अर्ज माघारीनंतर संस्थाचालक गटातून विद्यापीठ विकास आघाडीचे पृथ्वीराज पाटील तर प्राचार्य गटातून प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, शिक्षक गटातून सुटाचे डॉ. बबन सातपुते तर पदवीधर गटातून अमरसिंह रजपूत यांची व्यवस्थापन परिषदेवर बिनविरोध निवड झाली. पदवीधर एक आणि शिक्षक एक अशा दोन जागेसाठी निवडणूक होणार आहे. व्यवस्थापन परिषदेवरही विद्यापीठ विकास आघाडीचे वर्चस्व कायम राहिल्याने विकास आघाडीच्या गोटात आनंदाचे वातावरण आहे.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेवर प्राचार्य, शिक्षक, नोंदणीकृत पदवीधर आणि व्यवस्थापन प्रतिनिधीमधून प्रत्येकी २ सदस्य निवडून द्यावयाचे असतात. यापैकी प्राचार्य गटासाठी सर्वच अर्ज माघार घेतल्याने दोन जागा बिनविरोध निवडून आल्या. शिक्षक अनुसुचित जाती गटाची एक जागा बिनविरोध तर खुल्या प्रवर्गातील एका जागेसाठी निवडणूक लागली आहे.

नोंदणीकृत पदवीधर भटक्या विमुक्त जमाती गटातून एक जागा बिनविरोध तर एका जागेसाठी निवडणूक लागली आहे. व्यवस्थापन परिषद गटातील तीनपैकी दोन अर्ज माघार घेतल्याने एक जागा बिनविरोध तर अनुसुचित जमाती राखीव जागेसाठी एकही अर्ज आलेला नाही. आज (दि. २) रोजी आलेल्या हरकतींवर सुनावणी झाल्यानंतरच अंतिम चित्र स्पष्ट होईल.